३८ वा
वार्षिक अहवाल
सन २०२५-२०२६






*Celebrating*

# 150 Years of वंदे मातरम्



## १८७०-१८७५ 'वंदे मातरम्' ची रचना

या काळात प्रसिद्ध साहित्यिक बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी 'वंदे मातरम्' हे गीत लिहीले. ते त्या वेळी ब्रिटिश सरकारमध्ये अधिकारी होते, परंतु त्यांच्या मनात भारताबद्दल प्रचंड प्रेम होते. भारतमातेचे स्तवन करणारे गीत लिहावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांनी संस्कृत आणि बंगाली भाषेचे मिश्रण करून हे गीत तयार केले. या गीतात भारतभूमीला माता (आई) मानून तिचे सौंदर्य, संपन्नता आणि शक्ती यांचे वर्णन केले आहे. ''सुजलां सुफलां, मलयजशीतलाम्'' अशा शब्दांद्वारे भारताची नैसर्गिक संपन्नता दर्शवली आहे. ही रचना पुढे भारतीय स्वातंत्र्य चळवळीची प्रेरणा ठरली.



# केशवस्मृति

## नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल


Website : www.keshavsmrutipatpedhi.com Email : keshav_ho@rediffmail.com

केशवस्मृति
नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल

# ।। सन्माननीय संचालक मंडळ ।।



श्री.अमित ओझे
अध्यक्ष



ॲड.श्री.प्रफुल्ल म्हात्रे
उपाध्यक्ष



श्री.मकरंद बापट
संचालक



श्री.अविनाश कोळी
संचालक



श्री.सुबोध भिडे
संचालक



श्री.माणिक देवकांबळे
संचालक



सौ.संगीता परदेशी
संचालिका



श्री.अशोक नाईक
संचालक



श्री.प्रतिक बहिरा
संचालक



सौ.अंजली सिधये
संचालिका

**३८ वा वार्षिक अहवाल (सन २०२५-२६)**

## केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल

# वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दि. १३ जून, २०२६ रोजी सायं ६.०० वाजता, विरुपाक्ष हॉल, दुसरा मजला, रत्नाकर शंकर खरे मार्ग, पनवेल** येथे खालील विषयांवर विचार विनिमय करणेकरीता आयोजित केली आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सदर सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) संस्थेच्या दि. ०५/०७/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रकास मान्यता देणे आणि कायदा व नियम यांस अनुसरुन नफा विभागणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे. सन २०२६-२०२७ वर्षाकरीता केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व २०२५-२०२६ सालच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे व मान्यता देणे.

३) सन २०२५ ते २०२६ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा विचार करणे, स्विकारणे तसेच मान्यता देणे. सन २०२४-२०२५ वर्षाच्या लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल सादर करणे.

४) सन २०२६-२०२७ या वर्षासाठी अंतर्गत हिशेब तपासनीसाची नेमणूक करणे.

५) सन २०२६-२०२७ या वर्षासाठी निबंधकांनी जाहीर केलेल्या पॅनलमधील पात्र वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांच्या मानधनास मान्यता देणे.

६) सुधारीत आदर्श उपविधींना मान्यता देणे.

७) नियम ४९ नुसार कर्ज निर्लेखन प्रस्तावास मान्यता देणे.

८) मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या विषयांचा विचार करणे.

दिनांक : ३० मे २०२६

**ॲड.श्री. प्रफुल्ल म्हात्रे**
उपाध्यक्ष

### विशेष सूचना

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास हिच सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर भरविली जाईल.

२) संस्थेचे आर्थिक हिशेब अथवा अन्य बाबतीत माहिती अथवा स्पष्टीकरण हवे असल्यास दि. ०४/०६/२०२६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात लेखी विचारणा करावी.

३) ज्या सभासदांना काही प्रस्ताव अथवा सूचना मांडावयाच्या आहेत त्यांनी त्या दि. ०४/०६/२०२६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा पाठवाव्यात व सभेला स्वत: उपस्थित रहावे.

**ॲड.श्री. प्रफुल्ल म्हात्रे**
उपाध्यक्ष

# संचालक मंडळाचा अहवाल

**आदरणीय सभासद बंधू-भगिनींनो,**

आपल्या संस्थेचा ३८ वा वार्षिक अहवाल संचालक मंडळाच्यावतीने आपणांस सविनय सादर करीत आहे. अहवाल वर्षात पतसंस्थेने चांगली आर्थिक प्रगती केली आहे. अहवाल वर्षात संस्थेने आपल्या ग्राहकांकरीता विविध ठेव व कर्ज योजना कार्यान्वित केल्या होत्या.

दरवर्षीप्रमाणे अक्षय्यतृतीयेच्या निमित्ताने मुदतठेवींची ''**अक्षय्य ठेव योजना**'' व गणेशोत्सवासाठी ''**सुखनिधी रिकरिंग डिपॉझिट**'' योजना संस्थेने जाहीर केली होती. सदर रिकरिंग योजनेमध्ये संस्थेकडे ९३१ इतकी एकूण खाती उघडली गेली व संस्थेशी नविन ४९ ग्राहक जोडले गेले.

अहवालवर्षात संस्थेच्या सेक्टर ०३ शाखेला २० वर्ष पूर्ण झाली. २०व्या वर्धापनदिनानिमित्त संस्थेने सेक्टर ०३ शाखेच्या ग्राहकांकरीता माहे फेब्रुवारी महिन्यात ग्राहक मेळाव्याचे आयोजन केले होते. सदर मेळव्यास ग्राहकांनी चांगल्याप्रकारे उपस्थिती दर्शविली व त्यायोगे ग्राहक व पतसंस्था यांचेमध्ये परस्पर संवाद निर्माण झाला. ग्राहकांनी संस्थेप्रती त्यांचे मनोगत व अनुभव कथन केले.

गेल्या सहा वर्षांपासून आपल्या पतसंस्थेच्या ग्राहकांकरीता संस्थेने सोन्याचे नाणे खरेदीकरीता **सुवर्णसंचय कर्ज योजना** सुरु केली आहे. सदर योजनेअंतर्गत ९९९ दर्जाची नामांकित मान्यताप्राप्त कंपनीकडून सोन्याची नाणी दरमहा हप्त्यावर ग्राहकांना उपलब्ध करुन देण्यात येतात. सोन्याच्या वाढत्या भावामुळे भविष्यात सोने घेणे हे सर्वसामान्य लोकांसाठी अवघड होत आहे. त्यासाठी संस्था २ ग्रॅम, ५ ग्रॅम व १० ग्रॅम सोन्याची नाणी मागणीनुसार चालू बाजारभावाने ग्राहकांना उपलब्ध करुन देते. या वर्षातही संस्थेची सदर योजना सुरु असून त्यास ग्राहकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

अशाप्रकारे अहवालवर्ष अखेर आपल्या संस्थेने रु.९९.१० कोटी इतक्या ठेवी संकलित केल्या असून संस्थेचा मिश्र व्यवसाय रु. १६९.४८ कोटी एवढा झाला आहे. संस्थेचा सी.डी. रेशो ६६.३२% आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात संस्थेचा ठेवींचा टप्पा रु.१०० कोटींवर पोहोचेल.

## पतसंस्थेच्या सांपत्तिक स्थितीचा आढावा

अहवाल वर्षात पतसंस्थेच्या आर्थिक स्थितीची आकडेवारी खालीलप्रमाणे : *(रु. लाखात)*

| क्र. | तपशील | २०१९-२०२० | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ | २०२३-२०२४ | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | भाग भांडवल | २४१.७३ | २४२.९५ | २४३.७१ | २३६.०७ | २३४.३८ | २५५.४४ | २५८.६३ |
| २) | भागधारक संख्या | ६०८० | ६५६३ | ६८१६ | ७०३७ | ७४८१ | ७६३६ | ७७०४ |
| ३) | गुंतवणूक - निधी | ६७९ | ७४८ | ७७८ | ९१० | ९७८ | १०१४ | १०९६ |
| ४) | गुंतवणूक - तरलता | २८२२ | २९६२ | २७३८.०८ | ३१८५ | २५०४ | २९३१ | ३०५६ |
| ५) | ठेवी | ७३४४.६० | ७५१२.०३ | ७९३९.९९ | ८४४१.८४ | ८९००.४६ | ९४२६.२५ | ९९०९.८६ |
| ६) | कर्जे | ५०११.३६ | ५०७२.९९ | ५६९३.१४ | ५६७६.१९ | ६,६८७.६९ | ६६१३.१४ | ७०३८.०२ |
| ७) | ढोबळ नफा | ३९७.२५ | ३७२.१९ | ३६८.९७ | ३६८.४९ | ३८९.८२ | ४१०.०६ | ४८१.६१ |
| ८) | निव्वळ नफा | ८८.९९ | ६०.७२ | ६५.३६ | ६९.९५ | ७७.५५ | ८०.०७ | ८८.८५ |
| ९) | खेळते भागभांडवल | ८८७३ | ९१११ | ९५६१.९३ | १०२४३.२७ | ११९९६.७३ | १२७९८.५३ | १२०१९.६२ |
| १०) | लेखापरिक्षण वर्ग | अ | अ | अ | अ | अ | अ | अ |
| ११) | अनुत्पादीत कर्जे एन.पी.ए. | २२९ | २३५ | २३३ | २६१ | २६९ | ३७३ | ४९१ |
| १२) | निव्वळ एन.पी.ए.(%) | ३.८० | ५.५३ | ५.६६ | ४.६८ | ३.९० | ३.६२ | ३.१० |

## सभासद व भाग भांडवल

अहवाल वर्षात संस्थेच्या भागभांडवलात १.२५% वाढ झाली असून अहवाल वर्ष अखेर संस्थेकडे रु. २,५८,६२,८४०/- एवढे वसूल भागभांडवल जमा आहे. अहवाल वर्षात २०५ नवीन सभासद झाले असून १३७ सभासद राजीनामा, हस्तांतरण, मृत्यू इ. कारणास्तव कमी झालेले आहेत. दि. ३१/०३/२०२६ अखेर संस्थेची सभासद संख्या ७७०४ इतकी झाली आहे.

## ठेवी

अहवाल वर्ष अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रू. ९९.१० कोटी इतक्या झाल्या आहेत. पतसंस्थेच्या ठेवींमध्ये ५.१३% नी वाढ झाली आहे. अहवाल वर्षअखेर एकूण जमा ठेवींवरील व्याज खर्च ६.९९% इतका झाला आहे.

## गुंतवणूक

सहकार खात्याने नव्याने जारी केलेल्या गुंतवणूक निकषांनुसार पतसंस्थेने आपल्या अतिरिक्त रक्कमेची गुंतवणूक केली आह

| अ.क्र. | बँकेचे नांव | रक्कम (रु.लाखात) |
|---|---|---|
| १) | दि कॉसमॉस को.ऑप. बँक लि. | १७० |
| २) | दि सारस्वत को-ऑप बँक. लि. | २० |
| ३) | जनकल्याण सहकारी बँक. लि. | २०० |
| ४) | युनिटी स्मॉल फायनान्स बँक | १७२ |
| ५) | दि शामराव विठ्ठल को. ऑप. बँक लि. | १८५ |
| ६) | दि महानगर कॉ. बँक लि. | १५३ |
| ७) | दि नेव्हल डॉकयार्ड को. ऑप. बँक | २०० |
| ८) | राजकोट सहकारी बँक लि. | १७४ |
| ९) | भारत को. ऑप बँक, मुंबई लि. | २११ |
| १०) | एन.के.जी.एस.बी. को.ऑप. बँक लि. | १२७ |
| ११) | श्री वारणा सहकारी बँक लि. | २०० |
| १२) | कराड अर्बन को.ऑप. बँक लि. | १०५ |
| १३) | जी पी पारसिक जनता सहकारी बँक लि. | ५० |
| १४) | डोंबिवली नागरी सहकारी बँक. लि. | १२६ |
| १५) | जनता सहकारी बँक, पुणे | ६० |
| १६) | दि ग्रेटर बॉम्बे को-ऑप. बँक लि. | १५५ |
| १७) | देवगिरी नागरी सहकारी बँक लि. | १५५ |
| १८) | दि चिपळूण अर्बन को. ऑप. बँक | २१३ |
| १९) | दि कल्याण जनता सह. बँक लि. | १५ |
| २०) | सुर्योदय स्मॉल फायनान्स | २५ |
| २१) | दि यशवंत को. ऑप. बँक लि. | २० |
| २२) | नागपूर नागरीक सहकारी बँक लि. | ५० |
| २३) | अपना सहकारी बँक लि. | १०९ |
| २४) | ठाणे भारत सहकारी बँक लि. | २५ |
| २५) | दि विश्वेश्वर सहकारी बँक लि. पुणे. | ३२ |
| २६) | अण्णासाहेब सावंत को.ऑप.अर्बन बँक लि. | ४ |
| २७) | टीजेएसबी सहकारी बँक लि. | १०० |
| | **एकूण** | **३०५६** |

## कर्ज व वसुली

अहवाल वर्ष अखेर संस्थेचे येणे कर्ज रू. ७०.३८ कोटी इतके असून मागील वर्षीच्या तुलनेत येणे कर्जामध्ये ६.४२% नी वाढ झाली आहे. अहवाल वर्षात संस्थेने रू.२५.४७ कोटी इतके कर्ज वाटप केले असून रू.२१.२२ कोटी एवढे कर्ज वसूल केले आहे. अहवाल वर्षात संस्थेचे एकूण येणे कर्ज रक्कमापैकी ९३% तारणी कर्जे आहेत.

अहवाल वर्ष अखेर संस्थेने एन.पी.ए. करीता रू. ३५ लाख एवढ्या रकमेची तरतूद केली असून अहवाल वर्ष अखेर संस्थेची एन.पी.ए. तरतूद रक्कम रू.४९२ लाख एवढी आहे. संस्थेचा निव्वळ एन.पी.ए. ३.१०% आहे.

## थकीत कर्ज वसुली

पतसंस्थेच्या संपूर्ण कारभारात थकीत कर्जवसुली हा अतिशय महत्त्वाचा व कठीण टप्पा असतो. कर्ज वसुली विभागातील अधिकारी व कर्मचारी कर्जवसुलीबाबत काळजी घेत असतात व आवश्यकतेनुसार विविध प्रकारची कारवाई थकीत कर्जदारांवर केली जाते. आपल्या संस्थेचा सामोपचाराने व सामंजस्याने कर्जवसुली करण्यावर भर असतो. परंतु कर्जवसुली ही अपरिहार्य असल्याने आपणास सक्तीची कर्जवसुली कायदेशीर मर्यादेचे पालन करुन करावी लागते. जाणीवपूर्वक कर्ज थकविणाऱ्या कर्जदारांवर संस्था कडक कारवाई करत असते. संस्थेच्या सर्व कर्जदार व जामिनदार सभासदांना आवाहन करण्यात येते की पतसंस्थेने दिलेले कर्ज नियमित व वेळेत दिलेल्या हप्त्याप्रमाणे भरुन संस्थेस सहकार्य करावे व आपल्यावरील कायदेशीर कारवाई टाळावी.

## निर्लेखन

वरीलप्रमाणे कार्यवाही करुनसुध्दा काही कर्जदार आणि त्यांचे जामिनदार यांचेकडून काही अपरिहार्य कारणामुळे संबंधित रक्कमेची वसुली होऊ शकत नाही. त्यामुळे अशा कर्जांचे निर्लेखन करणे आवश्यक असते. याकरीता अशी कर्ज प्रकरणे शासकीय लेखापरिक्षकांकडून प्रमाणित करून नियम ४९ अन्वये निर्लेखनासाठी सभेपुढे ठेवलेली आहेत. ही कर्जे निर्लेखन करण्यास आपण मान्यता द्यावी, ही विनंती.

## नफा व नफा विभागणी

दि. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेचा ढोबळ नफा रु.४८१.६१ लाख एवढा झाला असून ढोबळ नफ्यातून देणे व्याज, खर्च आणि तरतुदी वगळता संस्थेला रु. ८८.८५ लाख एवढा निव्वळ नफा झाला आहे.

*(रु. लाखात)*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **ढोबळ नफा** | | **४८१.६१** |
| वजा – | १) | घसारा | ८.४० | |
| | २) | लेखापरिक्षण फी | ३.२५ | |
| | ३) | एन.पी.ए. तरतूद | ३५.०० | |
| | ४) | भविष्य निर्वाह निधी तरतूद | ०.३७ | |
| | ५) | सानुग्रह अनुदान तरतूद | ५.७५ | |
| | ६) | व्याज देणे | ३३९.९९ | ३९२.७६ |
| | | निव्वळ नफा | | ८८.८५ |
| | | अहवाल वर्षातील निव्वळ नफा (पूर्ण रकमेत) रु. | | ८८,८५,०३४.१५ |
| | | मागील वर्षातील शिल्लक नफा | | ४,१२८.३५ |
| | | | | ८८,८९,१६२.५० |

सहकार खात्याकडून केलेल्या सूचना आणि मार्गदर्शक तत्वे यांना अधीन राहून उपरोक्त ढोबळ नफ्याची विभागणी केलेली आहे. तसेच पुढील प्रमाणे निव्वळ नफ्याची विभागणी केलेली आहे. त्यास सभेने मान्यता द्यावी ही विनंती.

### नफा विभागणी :

| अ.क्र. | तपशील | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १. | राखीव निधी - नफ्याच्या २५% | २२,२१,२५९ |
| २. | लाभांश - १०% (प्रस्तावीत) | २५,५७,१५६ |
| ३. | लाभांश समिकरण निधी - नफ्याच्या २% | १,७७,७०१ |
| ४ | कर्मचारी / संचालक प्रशिक्षण निधी | १,००,००० |
| ५ | कर्मचारी कल्याण निधी | १,००,००० |
| ६ | कर्मचारी निवृत्ती रजा वेतन निधी | २,००,००० |
| ७ | ग्रॅच्युईटी खाते | १,७५,००० |
| ८ | स्वागत व आदरातिथ्य | १,५०,००० |
| ९ | निवडणूक निधी | ५०,००० |
| १० | सभासद कल्याण निधी | १,००,००० |
| ११ | धर्मादाय निधी | २,००,००० |
| १२ | वार्षिक/ विशेष सभा खर्च | २,००,००० |
| १३ | व्यवसाय वृध्दीकरण निधी | २,००,००० |
| १४ | इमारत निधी | ५,००,००० |
| १५ | सहकार प्रसार निधी | २,००,००० |
| १६ | उत्सव निधी | १,५०,००० |
| १७ | गुंतवणूक चढउतार निधी | ५,००,००० |
| १८ | उत्तम जिंदगीवरील तरतूद | १०,००,००० |
| १९ | लिगल फी | १,००,००० |
| | नफा तोटा पत्रकास वर्ग | ८,०४६.५० |
| | **एकूण** | **८८,८९,१६२.५०** |

### शाखा कामगिरी

अहवाल वर्षात संस्थेच्या तीनही शाखांची आर्थिक कामगिरी पुढीलप्रमाणे

**पनवेल शाखा :** (रक्कम रु.लाखात)

| तपशिल | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|
| ठेवी | ५७९३.९६ | ६,१५४.६४ | ६३७९.६८ | ६६५०.०७ | ६८५८.९२ |
| कर्जे | ४७०३.३८ | ४६५१.६८ | ५३३३.८९ | ५३४३.३७ | ५७८५.७३ |

### सेक्टर १५ शाखा :

| तपशिल | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|
| ठेवी | १२८४.७२ | १३३४.११ | १४२०.२९ | १५२७.१८ | १६९०.६६ |
| कर्जे | ६९५.१२ | ७४८.७७ | ८८२.१० | ८०४.६६ | ७५३.१२ |

### सेक्टर ०३ शाखा :

| तपशिल | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|
| ठेवी | ८६१.३१ | ९५३.०८ | ११००.४८ | १२४८.९९ | १३६०.२९ |
| कर्जे | २९४.६३ | २७५.७५ | ४७१.७० | ४६५.१० | ४९९.१७ |

### संचालक व त्यांचे नातेवाईक यांची कर्जे

अहवाल वर्ष अखेर संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडे असलेल्या कर्ज रक्कमेचा तपशील पुढील प्रमाणे :

| अ.क्र. | तपशील | दि.३१.३.२६ अखेर येणे रक्कम (रु.) | दि.३१.३.२६ अखेर अनियमीत रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | संचालक | ४९,७९,३९४/- | -- |
| २. | नातेवाईक | ४२,००,०००/- | -- |

### श्रद्धांजली

सरत्या आर्थिक वर्षात दिवंगत झालेले संस्थेचे सभासद, ग्राहक, हितचिंतक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय किर्तीचे थोर नेते, समाजसुधारक, शहीद जवान व अधिकारी, पोलिस दलातील शहीद कर्मचारी व अधिकारी इ.च्या प्रती केशवस्मृति परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

### ऋणनिर्देश

संस्थेच्या प्रगतीमध्ये अनेक लहान मोठ्या घटकांचा सहभाग असतोच. संस्थेचे सर्व भागधारक, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक, माजी संचालक, हितचिंतक यांनी संस्थेच्या प्रगतीत जे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. तसेच मा.जिल्हा उपनिबंधक, अलिबाग, रायगड व त्यांचे कार्यालयातील अधिकारी वर्ग, मा.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल व त्यांच्या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग ह्यांनी आम्हाला वेळोवेळी जे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे आभार.

सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.उदयजी जोशी ह्यांनी संस्थेच्या कामकाजात जे मोलाचे मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचे आभार.

तसेच रायगड जिल्हा पतसंस्थांचा महासंघ म.अलिबाग यांचे अध्यक्ष ॲड.श्री.जे.टी. पाटील, सर्व संचालक व कर्मचारी वर्ग यांचे त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार.

संस्थेशी निगडीत असलेल्या बँकांमधील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी वर्ग यांचे सहकार्याबद्‌दल आभार.

संस्थेचे अंतर्गत हिशेब तपासनीस श्री.अभिषेक सलाग्रे व त्यांचे सहकारी, ॲड.पराग म्हात्रे, ॲड.श्री.राजेंद्र गोडबोले, सी.ए. श्री.मुकुंद वैशंपायन, सी.ए. श्री.अतुल शेट्ये, सी.ए. श्री.मिलिंद वैशंपायन, शासनमान्य मूल्यांकनकार श्री.एन.जी.गोरे ह्यांनी संस्थेच्या कामकाजात केलेल्या मार्गदर्शनाबद्‌दल आभार. आपल्या संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी, संचालक, अधिकारी, कर्मचारी व स्वल्पबचत प्रातिनिधी यांनी आपली कामे योग्य रितीने पार पाडली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो व भविष्यातही आपणा सर्वांकडून संस्थेस असेच सहकार्य मिळेल अशी आशा व्यक्त करून सदरचा अहवाल आपणापुढे मंजूरीकरीता ठेवीत आहे.

**अमित म. ओझे**
**अध्यक्ष**

दि.०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६

| सन २०२४-२०२५ रूपये पैसे | खर्च | रूपये पैसे | सन २०२५-२०२६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| | **बँक व्याज खाते** | | २६,०६,२४५.८५ |
| ६२,७३,४१८.१२ | ओ डी खाते व्याज | २६,०६,२४५.८५ | |
| | **पगार खाते** | | ७५,३६,१७९.०० |
| ३,३७५.०० | कामगार कल्याण निधी खर्च | २,८५०.०० | |
| ६३,३६,६१२.०० | कर्मचारी पगार खाते | ५८,८२,८४०.०० | |
| १,६६,०००.०० | कर्मचारी प्रवास भत्ता खाते | १,४२,०००.०० | |
| ५,१०,७५९.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खर्च | ४,५४,४०३.०० | |
| ६५,९६९.०० | ग्रॅच्युटी | १,६२,७२७.०० | |
| ३,४१,०००.०० | सानुग्रह अनुदान | ७,८९,३८५.०० | |
| ४,०२,८६१.०० | कर्मचारी पगार - कंत्राटी | ८७,०००.०० | |
| ०.०० | कर्मचारी राज्य विमा निगम खर्च | १४,९७४.०० | |
| | **भाडे, कर व विमा खाते** | | ७,४८,४३०.०० |
| ९,७६,०७४.०० | भाडे, कर व विमा खाते | ७,४६,९३०.०० | |
| ०.०० | व्यवसाय कर खाते | १,५००.०० | |
| | **दिलेले कमिशन** | | ३,६९,०२४.१५ |
| ३६,५५१.९५ | बँक चार्जेस | ३४,४३३.१५ | |
| ०.०० | कर्जावरील बँक चार्जेस | १७७.०० | |
| ८,२९,५५५.०० | स्वल्पबचत कमिशन | ३,३४,४१४.०० | |
| | **इतर खर्च** | | १०,६०,६९७.८६ |
| १,३१,९२८.२५ | छपाई खर्च | ६७,१९२.१३ | |
| ५८०.०० | प्रवास खर्च | १,४००.०० | |
| १,०२,७४१.६४ | जाहिरात व प्रसिद्धी खर्च | ८५,६८१.५७ | |
| २,७४,०३१.८३ | टपाल खर्च | २,८२,६६०.७० | |
| १,७९,३२३.६५ | कार्यालयीन खर्च | १,८८,०४७.५० | |
| ४,२१,७७६.१२ | दुरुस्ती व देखभाल खर्च | ४,२३,२१५.९६ | |
| १०,२८७.०० | इंधन खर्च व कर्मचारी प्रवास खर्च | १२,५००.०० | |
| | बेरीज पुढील पानावर | | |

## अखेरचे नफातोटा पत्रक

| सन २०२४-२५ रूपये पैसे | जमा | रूपये पैसे | सन २०२५-२०२६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ७०,०५,०००.०० | उत्तम जिंदगी तरतूद | | १,०६,५५,०००.०० |
| १,०६,९७,०३२.०० | सहकारी संस्था व बँक गुंतवणूकीवरील आलेले व्याज | | १,६०,८०,४२१.६६ |
| | कर्जदार सभासदांकडून मिळणारे उत्पन्न | | १२,०१,५९९.०९ |
| १४,५९२.०८ | फॉर्म फिज | १२,३१९.५७ | |
| ९,६५०.०० | नोटीस फी खाते | २०,९२१.१९ | |
| ७,७७,१४५.३२ | सेवा शुल्क | ११,६८,३५८.३३ | |
| | सभासदांकडून आलेले व्याज | | ५,१८,२९,२६२.०० |
| ५३,८३,३०६.०० | वैयक्तिक कर्ज व्याज | ३१,६४,६४७.०० | |
| ७,२५,६५१.०० | मुदत ठेव तारण कर्ज व्याज | ७,६३,६९०.०० | |
| ३९,४७३.०० | स्वल्पबचत कर्ज व्याज | ५१,९०२.०० | |
| ७५,३४६.०० | मासिक ठेव तारण कर्ज व्याज | १,००,००९.०० | |
| ३,६०,१२४.०० | गृह तारण कर्ज व्याज | १,४२,४०५.०० | |
| २,१२,८२,४८६.०० | तारण कर्ज व्याज | २,३०,१९,८७८.०० | |
| ४,१२,०७१.०० | वाहन तारण कर्ज व्याज | १३,३९,०२४.०० | |
| ५३,७०,४७७.०० | सोनेतारण कर्ज व्याज | ७८,२९,५६८.०० | |
| १,५५,७७,६१३.०० | मॉर्गेज ओ.डी. कर्ज व्याज | १,५१,८०,१७२.०० | |
| २,७६,७२५.०० | कॅश क्रेडीट कर्ज व्याज | २,३७,९६७.०० | |
| २,४९,६८,१८७.०० | गुंतवणूकीवरील व्याज येणे | | १,८३,२९,०७४.०० |
| | अन्य उत्पन्न | | ४१,९४१.९२ |
| ०.०० | डिमांड ड्राफ्ट शुल्क | ५,३२७.३६ | |
| २०,६९८.०० | सुरक्षा ठेव व्याज म.रा. वि. मंडळ | ३६,६१४.५६ | |
| | सहकारी संस्था व बँक लाभांश | | १,३८,१०३.२० |
| १,३७,९४०.२० | लाभांश युनिटी फायनान्स (पी.एम.सी.) | १,३७,९४०.२० | |
| ०.०० | लाभांश पनवेल को. ऑप अर्बन बँक | ३.०० | |
| ०.०० | लाभांश रायगड जिल्हा पतसंस्थांचा महासंघ अलिबाग | १६०.०० | |
| | बेरीज पुढील पानावर | | |

**दि.०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६**

| सन २०२४-२५ रूपये पैसे | खर्च | रूपये पैसे | सन २०२५-२०२६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| | **ठेवीवरील दिलेले व्याज** | | **७,१६,४२,४७५.००** |
| ५,८१,५५,५१५.०० | मुदत ठेव व्याज | ६,२६,३८,७५१.०० | |
| ५,४४,९८५.०० | मागणी ठेव व्याज | २१,७५,५०८.०० | |
| १९,१२,२१०.०० | मासिक ठेव व्याज | १८,६३,५०७.०० | |
| १६,०४,२४९.०० | गणपती रिकरिंग योजना | १८,९२,६८०.०० | |
| २३,२९,८९२.०० | बचत ठेव व्याज | २४,०५,२१७.०० | |
| ९,२२,५६५.०० | स्वल्प बचत व्याज | ६,६६,८१२.०० | |
| | **संचालक सभा व भत्ते** | | **३५,७३५.००** |
| ४७,०००.०० | सभा खर्च | २९,२४०.०० | |
| ४,९००.०० | सभा भत्ता खाते | ६,४९५.०० | |
| ६,५४,८९८.०० | **घसारा** | | **८,४०,४९१.००** |
| २,९४,८६८.५० | कर्ज वसूली खर्च | | १,३८,४६७.८६ |
| ३,१२,१५०.०० | लेखापरिक्षण शुल्क खाते | | ३,४३,०००.०० |
| १,५५,२४०.०० | प्रोफेशनल फीज खर्च | | ३,८१,०४५.०० |
| १३,८९४.०० | लवाद व दावे खर्च खाते | | १,१५,५९४.०० |
| १२,६४०.०० | महासंघ वर्गणी | | ११,०००.०० |
| १०,००,०००.०० | संशयित व बुडीत कर्ज खाते | | ३५,००,०००.०० |
| ५,९०४.०० | मालमत्ता विक्रीतील नफा/तोटा | | २९,१८६.०० |
| १२,३१५.६१ | जी.एस.टी. खर्च | | ०.०० |
| ८०,५२२.०० | आर.सी.एम.वरील जी.एस.टी. | | ३२,७९७.०० |
| १.०० | गुंतवणूकीवरील ज्यादा घेतलेले व्याज | | ०.०० |
| **८०,०६,९२३.९३** | **नफा** | | **८८,८५,०३४.१५** |
| **९,३१,३३,५१६.६०** | **एकूण** | | **९,८२,७५,४०१.८७** |

## अखेरचे नफातोटा पत्रक

| सन २०२४-२५ रूपये पैसे | जमा | रूपये पैसे | सन २०२५-२०२६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| | | | |
| ९,३१,३३,५१६.६० | एकूण | | ९,८२,७५,४०१.८७ |

**ॲड.श्री. प्रफुल्ल म्हात्रे**
उपाध्यक्ष

**श्री.अमित म.ओझे**
अध्यक्ष

दि. ३१.०३.२०२६

| सन २०२४-२५ रुपये पैसे | जिंदगी व देणी | रुपये पैसे | सन २०२५-२६ रु पये पैसे |
|---|---|---|---|
| ४,००,००,०००.०० | **अधिकृत भागभांडवल** | | ४,००,००,०००.०० |
| २,५५,४४,३९०.०० | वसुल भागभांडवल | २,५८,६२,८४०.०० | २,५८,६२,८४०.०० |
| ९,६६,६८,९१०.३४ | **निधी** | | १०,२९,९७,९७७.२९ |
| २,८४,१७,७८६.२८ | राखीव निधी | ३,०५,८२,९०२.१३ | |
| १,६७,२७,७३६.६४ | इमारत निधी | १,७२,२७,७३६.६४ | |
| ४,६०,२३,२२७.६९ | बुडीत व संशयित निधी | ४,९२,३३,९१२.६९ | |
| २०,१८,५३०.०० | लाभांश समीकरण निधी | २१,७८,६६८.०० | |
| ३,०४,३९५.०० | धर्मादाय निधी | २,३४,३९५.०० | |
| २,३३,३२५.६३ | व्यवसाय वृध्दीकरण निधी | २,७७,२६७.७३ | |
| ३,७०,३९६.०० | प्रशिक्षण निधी | ४,४४,७८४.०० | |
| ३,१८,०१५.०० | निवडणूक निधी | ३,६८,०१५.०० | |
| ३,२८,७२४.२० | उत्सव निधी | ३,७८,७२४.२० | |
| ९,४०,७०८.०० | कर्मचारी निवृत्ती रजा वेतन निधी | ९,५०,१८५.०० | |
| ६,४७,१४८.०० | सभासद कल्याण निधी | ६,९३,७९३.०० | |
| ३,३८,९१७.९० | कर्मचारी कल्याण निधी | ४,२७,५९३.९० | |
| ९४,२६,२५,८२७.३१ | **ठेवी** | | ९९,०९,८६,४५३.७० |
| १,८९,८०,६९८.०० | मागणी ठेव | २,४५,००,९९५.०० | |
| ८,११,७६,५३९.३१ | बचत ठेव | ८,०५,६०,९१८.७० | |
| ६,४३,११,६८०.०० | दरमहा व्याज योजना | ६,७७,६१,१५१.०० | |
| ७१,६६,२८,९३६.०० | मुदत ठेव | ७६,१०,९८,७००.०० | |
| २,२१,७३,३१९.०० | आवर्त ठेव | २,३४,४०,८८१.०० | |
| २,६२,३४,९००.०० | गणपती रिकरिंग योजना | ३,३०,२९,२८१.०० | |
| १,३१,१९,७५५.०० | स्वल्पबचत ठेव | ५,९४,५२७.०० | |
| ४,१५,३८७.०० | **अन्य देणी** | | ३,६६,००९.०० |
| ३,८३,९३६.०० | लाभांश देणे | ३,६०,२०९.०० | |
| ९,७००.०० | कर्मचारी व संचालक वर्गणी- महाराष्ट्र स्टेट वेलफेअर असोसिएशन | ५,८००.०० | |
| | बेरीज पुढील पानावर | | |

## अखेरचा ताळेबंद

| सन २०२४-२५ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | सन २०२५-२६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १७,६३,२३३.०० | रोख शिल्लक | | १२,१२,५५६.०० |
| १६,७०,२८७.६९ | बँक बचत/चालू खाते शिल्लक | | २२,९०,९८८.१२ |
| १०,६२,६२,८२०.७० | निधी गुंतवणूक | | ११,७३,९१,८३३.७० |
| २,६४,७८०.०० | लिगल फीज गुंतवणूक | २,८४,६१६.०० | |
| ९,९६,९३३.०० | कर्मचारी निवृत्ती निधी गुंतवणूक | १०,७१,६१३.०० | |
| २,९७,१४,८३९.७० | राखीव निधी गुंतवणूक | ३,२१,७०,४८०.७० | |
| ४,८७,६९,०६०.०० | बुडीत व संशयीत कर्ज निधी | ५,३५,५६,७९७.०० | |
| ४,७२,०३१.०० | आदरातिथ्य गुंतवणूक | ४,७५,१८४.०० | |
| २,९६,९१२.०० | कर्मचारी कल्याण निधी गुंतवणूक | ३,११,०५५.०० | |
| ५,२४,५९७.०० | उत्सव निधी गुंतवणूक | ५,६३,८९६.०० | |
| ४,५१,३३३.०० | तात्काळ रुग्णसेवा गुंतवणूक | ४,८५,१४४.०० | |
| १,३२,९७,१४२.०० | इमारत निधी गुंतवणूक | १,४८,४६,५५३.०० | |
| २१,१८,९५७.०० | लाभांश समिकरण निधी गुंतवणूक | २२,७७,६८९.०० | |
| ५२,४८१.०० | धर्मादाय निधी गुंतवणूक | २,६१,२२९.०० | |
| ६,५२,९९९.०० | सभासद कल्याण निधी गुंतवणूक | ६,७०,०९७.०० | |
| ३,४५,२७१.०० | निवडणूक निधी गुंतवणूक | ३,६३,२४२.०० | |
| ७८,८८,८७१.०० | गुंतवणूक चढ उतार निधी गुंतवणूक | ९३,११,२४९.०० | |
| २,११,०१७.०० | सहकार प्रसार खाते गुंतवणूक | ४,२७,६८४.०० | |
| २,०५,५९७.०० | प्रशिक्षण निधी गुंतवणूक | ३,१५,३०५.०० | |
| ५७,०९,२३७.०० | मासिक ठेव गुंतवणूक | | २१,३८,०७९.०० |
| ४२,२६,४८,८११.०० | मुदत ठेव गुंतवणूक | | ३४,२७,०७,८०१.०० |
| ६६,१३,१४,४५८.७० | कर्ज | | ७०,३८,०२,२३१.७१ |
| ७,४१,९९८.०० | आवर्त ठेव तारण कर्ज | १०,२९,३०१.०० | |
| ६,७८,७६६.०० | स्वल्पबचत तारण कर्ज | ०.०० | |
| ६,१६,०५,२२२.०० | सोने तारण कर्ज | ११,५३,५७,५६६.०० | |
| ८७,७२,८९३.०० | मुदत ठेव तारण कर्ज | ४०,६५,८२९.०० | |
| | बेरीज पुढील पानावर | | |

दि. ३१.०३.२०२६

| सन २०२४-२५ रुपये पैसे | जिंदगी व देणी | रुपये पैसे | सन २०२५-२६ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १०,३४,५१,२३४.०९ | **बँक ओडी खाते** | | २,२६,५३,२०९.७३ |
| १,०२,१२,८२२.२२ | **तरतुदी** | | १,१३,३५,०८०.७८ |
| ३,४३,३६९.०० | कर्मचारी सानुग्रह अनुदान तरतूद | ५,७६,८१८.०० | |
| २,७०,०००.०० | लेखापरिक्षण शुल्क देणे | २,९२,५००.०० | |
| ४४,२९३.०० | टी. डी. एस. देणे | ३३,९२३.०० | |
| ३,४७,१३५.०० | सहकार प्रसार खाते तरतूद | ५,४७,१३५.०० | |
| ७४,६७३.०६ | जी.एस.टी. देणे | ६७,०६३.३७ | |
| ७५,००,०००.०० | गुंतवणूक चढउतार निधी तरतूद | ८०,००,०००.०० | |
| ४,००,०००.०० | तात्काळ रुग्णसेवा | ४,००,०००.०० | |
| २,७९,९२८.१६ | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च तरतूद | २,२४,९६८.४१ | |
| ५,०१,३३८.०० | आदरातिथ्य खर्च तरतूद | ५,९३,३५८.०० | |
| २,५२,९६५.०० | लिगल फीज देणे | ३,२२,९६५.०० | |
| १,९९,१२१.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व कर्मचारी राज्य विमा निगम तरतूद | ६८,३४९.०० | |
| 0.00 | ग्रॅच्युईटी देणे | १,७५,०००.०० | |
| 0.00 | कर्मचारी पगार देणे | ३३,००१.०० | |
| ३,७४,००,७८४.०० | **ठेवीवरील व्याज देणे** | | ३,८८,७०,८०२.०० |
| १०,९२,३३९.०० | व्याज देणे मागणी ठेव | १९,७३,८९५.०० | |
| ३,४४,१०,६५९.०० | व्याज देणे मुदत ठेव | ३,४८,०३,१५१.०० | |
| १८,९७,७८६.०० | व्याज देणे मासिक ठेव | २०,९३,७५६.०० | |
| | **इतर** | | |
| ५,५५,४१,५८२.०० | व्याज येणे तरतूद | | ६,६३,९७,३१५.०० |
| ७,१९६.४२ | नफा तोटा (संचीत) खाते | | ४,१२८.३५ |
| ८०,०६,९२३.९३ | अधिक चालू सालचा नफा | | ८८,८५,०३४.१५ |
| १,२७,९८,५३,३०६.३१ | बेरीज पुढील पानावर | | १,२६,८३,५८,८५०.०० |

## अखेरचा ताळेबंद

| सन २०२४-२५ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | सन २०२५-२६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| २४,६६,५१,४८३.०० | मॉर्गेज ओव्हरड्राफ्ट कर्जे | २५,४०,९८,१६३.०० | |
| ५,१९,५७,९८१.५८ | वैयक्तिक कर्ज | ४,२३,६८,६४३.५८ | |
| २,१८,७०,०७६.०० | वाहन तारण कर्ज | १,८५,५०,७६४.०० | |
| ४७,४२,६४९.०० | मालतारण कर्ज | २६,६०,०६५.०० | |
| २५,८७,८५,००२.१३ | तारणी कर्ज | २६,२८,४७,८४९.१३ | |
| ९,४०,४९८.०० | प्रमाणपत्र तारण कर्ज | ८,४०,४९८.०० | |
| २१,३४,४८१.०० | कॅश क्रेडीट कर्ज | १९,८३,५५३.०० | |
| २४,३३,४०९.०० | गृह तारण कर्ज | ०.०० | |
| **५४,९९,११७.७८** | **स्थावर व जंगम मालमत्ता** | | **६८,६८,४६७.४८** |
| ९२,६६४.०० | दुचाकी गाडी | ७८,७६४.०० | |
| १६,१५,४८२.०० | फर्निचर | ३०,९२,१५२.०० | |
| ६,५२,५२५.५३ | इलेक्ट्रिकल फिटिंग | ७,२१,६७५.६१ | |
| १,१४,६३९.०० | एअर कंडिशनर | २,३५,६८७.०० | |
| ५०,२३७.०० | सिक्युरीटी सामुग्री | ४५,२१४.०० | |
| १५,०२१.४१ | संगणक | १८,७५४.०३ | |
| ७२,५७६.४५ | डेडस्टॉक | ७५,६६१.४५ | |
| १५,६६९.३९ | करन्सी काऊंटिंग मशीन | १७,२८६.३९ | |
| २८,७०,३०३.०० | कार्यालयीन जागा | २५,८३,२७३.०० | |
| **३७,१००.००** | **अन्य गुंतवणूक** | | **३७,१००.००** |
| **५४,२६०.००** | **अन्य ठेवी** | | **५४,२६०.००** |
| ५४,२६०.०० | सिक्युरीटी डिपॉझीट म.रा.वि.म.जोडणी | ५४,२६०.०० | |
| ९,०००.०० | दूरध्वनी अनामत | ०.०० | |
| ४,००,०००.०० | कार्यालय अनामत | ०.०० | |
| ६२,०९३.०० | म.रा.वि.म ठेव व्याज येणे | ०.०० | |
| | बेरीज पुढील पानावर | | |

दि. ३१.०३.२०२६

| सन २०२४-२५ रुपये पैसे | जिंदगी व देणी | रुपये पैसे | सन २०२५-२६ रु पये पैसे |
|---|---|---|---|
| | | | |
| १२७,९८,५३,३०६.३५ | एकूण | | १,२६,८३,५८,८५०.०० |

## अखेरचा ताळेबंद

| सन २०२४-२५ रूपये पैसे | मालमत्ता व येणी | रूपये पैसे | सन २०२५-२६ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ८,०७४.३९ | खरेदीवरील इनपुट टॅक्स क्रेडीट | | २,९६२.४५ |
| १,२००.०० | ॲधेसिव्ह स्टँप येणे | | २९,६००.०० |
| ५,५५,४१,५८२.०० | कर्जावरील येणे व्याज | | ६,६३,९७,३१५.०० |
| ५,५८,५१३.७३ | टी.डी.एस. | | ५,५८,५१३.७३ |
| १२,९६,९५४.९४ | टी.डी.एस.2020-२१ | | १२,९६,९५४.९४ |
| ११,९३,१४९.२० | टी.डी.एस.२०२१-२२ | | ११,९३,०१७.२० |
| १,२७,९९१.५० | टी.डी.एस.२०२२-२३ | | १,२७,८८८.५० |
| २०,०५,७५६.०० | टी.डी.एस.२०२३-२४ | | २०,१२,२२७.०० |
| ३०,९५,३०२.०० | टी.डी.एस.२०२४-२५ | | ३१,०१,०७८.०० |
| ०.०० | टी.डी.एस.२०२५-२६ | | २७,७८,२८३.०० |
| १,२२,७१२.६७ | आय.टी.सी. | | ६९,१२९.१७ |
| ७,९२,४३९.०० | ॲडव्हान्स अपील कर | | ७,९२,४३९.०० |
| ८४,५९१.०० | प्रिपेड खर्च | | १,५५,२८९.०० |
| ५,४९९.०० | ॲडव्हान्स विमा हप्ता | | १,०१,७१४.०० |
| ९५,८९,१२२.०० | उत्तम जिंदगी तरतूद | | १,३२,३९,१२२.०० |
| १२७,९८,५३,३०६.३१ | एकूण | | १२६,८३,५८,८५०.०० |

**ॲड.श्री. प्रफुल्ल म्हात्रे**
उपाध्यक्ष

**श्री.अमित म.ओझे**
अध्यक्ष

# सन २०२६ - २०२७ चे अंदाजपत्रक

| तपशील | रक्कम (रु.) | तपशील | रक्कम (रु.) |
|---|---:|---|---:|
| येणे व्याज | ६,८२,४०,५५६ | देणे व्याज | ७,७९,३८,१०१ |
| गुंतवणूकीवरील व्याज | ३,२०,१०,७८४ | भाडे, कर व विमा | ८,३७,२०८ |
| अन्य उत्पन्न | २०,००,००० | पगार खाते | ७९,१२,९८८ |
| | | टपाल खाते | ३,१०,९२७ |
| | | छपाई खाते | ७३,९११ |
| | | लवाद दावा खर्च | १,२१,३७४ |
| | | जाहिरात खर्च | १,०२,८१८ |
| | | प्रवास खाते | २७,८०० |
| | | संचालक सभा भत्ते व खर्च | ३९,३०९ |
| | | कार्यालयीन खर्च | २,१६,२५५ |
| | | कमिशन | ५०,००० |
| | | घसारा | ८,८२,५१६ |
| | | ऑडीट फी | ३,९४,४५० |
| | | मालमत्ता विक्री तोटा | ५०,००० |
| | | दुरूस्ती व मेंटेनन्स | ४,६५,५३८ |
| | | प्रोफेशनल फीज | ४,१९,१५० |
| | | रायगड जिल्हा महासंघ–वर्गणी | ११,५५० |
| | | अन्य खर्च | १,००,००० |
| | | एन.पी.ए.तरतूद | २५,००,००० |
| | | कर्ज वसुली खर्च | १,७३,०८५ |
| | | निव्वळ नफा | ९६,२४,३६३ |
| **एकूण** | **१०,२२,५१,३४०** | **एकूण** | **१०,२२,५१,३४०** |

# वैधानिक लेखापरिक्षक म्हणून आर्थिक विवरणाचा अहवाल

१) आम्ही केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल,या संस्थेचा सोबत जोडलेल्या आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण केले आहे. ज्यामध्ये दि.३१/०३/२०२६ अखेरचे ताळेबंद पत्रक असून त्या वर्षाच्या अखेरपर्यंतचे नफा-तोटा विवरणपत्रक तसेच हिशोबांच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश आणि स्पष्टीकरण माहिती दिलेली असून संस्थेचे दि.०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ या कालावधीचे लेखापरिक्षण केले आहे.

२) **आर्थिक विवरणपत्राबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :**
महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० आणि त्या खाली बनविलेले या अन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अंमलात आणणे आणि आर्थिक विवरण तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण, संबंधात महत्त्वाच्या चुकीच्या विवरणपत्रामधून मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल.

३) **लेखापरिक्षकाची जबाबदारी :**
केलेल्या लेखापरिक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या पायावरआहे आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंटस् ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम यांच्या प्रमाणकाप्रमाणे लेखापरिक्षणाचे संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नितिमूल्यांचे पालन होणे जरुरीचे आहे व ते आम्ही पाळले आहे आणि लेखापरिक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्त्वाच्या चुकीच्या विवरणापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

४) लेखापरिक्षेमध्ये लेखापरिक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही याची पध्दत आहे व लेखापरिक्षेमध्ये अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्त्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणपत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण, अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमा खर्चाच्या मूल्यांकनाच्या विनियोगाचा वापर आणि जमा खर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण याचा समावेश होतो.

५) लेखापरिक्षेचा पुरावा जो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे असा विश्वास आहे.

६) आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पूर्ण माहितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिध्द केलेली संस्थेला जरुरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारणपणे भारतात मान्य केलेला आहे.
१. ताळेबंदपत्रकाच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत दिनांक ३१/०३/२०२६ अखेरचे
२. नफा आणि तोटा विवरणपत्रकाच्या बाबतीत त्या वर्षीच्या शेवटच्या दिवशीचा नफा दिसतो.

७) **इतर कायदेशीर आणि नियामक बाबींवरील अहवाल :**
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद पत्रक आणि नफा-तोटा विवरण तयार केलेले आहे

८) **आम्ही अहवाल देतो की,**
अ) आम्हाला मिळालेल्या माहितीवरुन आणि स्पष्टीकरणानुसार जे आमच्या लेखापरिक्षणासाठी जरुरी आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार आम्हाला असे आढळून आले आहे की, ते समाधानकारक आहे.
ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीत आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारात करण्यात आले आहेत.
क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

९) लेखांकन मानकप्रमाणे ताळेबंद पत्रक व नफा आणि तोटा हिशोब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

१०) आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो -
१) या अहवाला संदर्भात ताळेबंद पत्रक आणि नफा तोटा आणि खर्चाचा हिशोब हे हिशोबाची पुस्तके आणि विवरणपत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.
२) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंद पत्रके जी अधिनियमानुसार जरुरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.
३) सन २०२५-२६ या कालावधीसाठी संस्थेला 'अ' लेखापरिक्षण वर्ग मिळालेला आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३०/०४/२०२६

सही/-
**पी.जी.रानडे ॲन्ड कंपनी**
सनदी लेखापाल

# केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल

मुख्यालय - १०२/१०३ आदित्य विहार को.हौ.सोसायटी, महात्मा फुले रोड, पनवेल फोन : ८६५७००१८४१

पनवेल शाखा : १०२/१०३ आदित्य विहार को.हौ.सोसायटी, महात्मा फुले रोड, पनवेल फोन : ८६५७००१८४२

सेक्टर १५ शाखा : साई आर्केड अपार्टमेंट, शॉप नं.५, प्लॉट नं.२०, सेक्टर १५ अे, नविन पनवेल. फोन नं. : ८६५७००१८४३

सेक्टर ३ शाखा : रिद्धी सिद्धी रेसिडेंसी, शॉप नं.१४, सेक्टर ३, नविन पनवेल. फोन नं. : ८६५७००१८४४

**श्री.अभिषेक सलाग्रे (सी.ए.)**
अंतर्गत हिशेब तपासनीस

**श्री.पराग म्हात्रे**
ॲडव्होकेट व नोटरी

**श्री.अनिल मानकामे**
सुवर्णमूल्यांकनकार

**श्री.एन.जी.गोरे**
शासनमान्य मूल्यांकनकार

## स्वल्पबचत प्रतिनिधी

श्री.संजीव बहिरा

## सभासदांकरीता सूचना

१) संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस फक्त सभासदांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

२) सभासदांना संस्थेच्या योजनांबाबतची माहिती व इतर सूचना सभासदांपर्यंत पोहोचविण्याकरीता सभासदांनी संस्थेचा व्हॉट्सॲप नंबर आपल्या मोबाईलमध्ये सेव्ह (save) करुन ठेवावा. व्हॉट्सॲप नंबर-९९३०८९८७३३

३) सभासदांनी आपला बदललेला पत्ता व मोबाईल नंबर संस्थेकडे नोंद करावा.

४) वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यावर उपस्थित सभासदांसाठी भोजनाची व्यवस्था केली आहे.

**ॲड.प्रफुल्ल म्हात्रे**
उपाध्यक्ष

# ॥ क्षणचित्रे ॥



संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस
पनवेलचे आमदार मा.श्री.प्रशांतजी ठाकूर हे उपस्थित होते
त्यांचा सत्कार करतांना संस्थेचे अध्यक्ष व संचालक मंडळ



संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर झालेल्या कृतज्ञता निधी
समर्पण सोहळ्यात संस्थेतर्फे मा.आमदारांच्या हस्ते कृतज्ञता
निधी अर्पण करण्यात आला.



संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेचे कर्मचारी
श्री.गंगाराम वाघमारे यांचा संस्थेतर्फे २५ वर्ष सेवापूर्ती प्रीत्यर्थ
मा.आमदार श्री.प्रशांतजी ठाकूर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.




पतसंस्था व एच.एन.रिलायान्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने
माहे एप्रिल २०२५ मध्ये महिलांकरीता निःशुल्क कर्करोग निदान
शिबीराचे (पॅपस्मिअर टेस्ट) आयोजन केले होते




संस्थेतर्फे सेक्टर ०३ शाखेच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त
आयोजित केलेल्या ग्राहक मेळाव्यात ग्राहकांना
संबोधित करताना मा.अध्यक्ष



संस्थेतर्फे सेक्टर ०३ शाखेच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त
आयोजित केलेल्या ग्राहक मेळाव्यात उपस्थित ग्राहक



# भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील वंदे मातरम्च्या जयघोषाने ब्रिटीशांविरूद्ध लढणारे काही क्रांतिकारक ...

## विनम्र अभिवादन ..



**मंगल पांडे**
१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाची ठिणगी पेटवणारे पहिले क्रांतिकारक सैनिक



**राणी लक्ष्मीबाई**
"मी माझी झाशी देणार नाही" म्हणत रणांगणात शौर्याने लढणारी झाशीची राणी



**भगतसिंग**
तरुणाईला क्रांतीची प्रेरणा देणारा निर्भय आणि बलिदानी क्रांतिकारक



**राजगुरू**
देशासाठी हसत हसत फाशी स्वीकारणारे धाडसी क्रांतिकारक



**सुखदेव थापर**
भगतसिंगांसोबत स्वातंत्र्यासाठी बलिदान देणारे महान देशभक्त



**बाळ गंगाधर टिळक**
"स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" अशी गर्जना करणारे लोकमान्य



**सुभाषचंद्र बोस**
"तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आज़ादी दूँगा" म्हणत आजाद हिंद सेनेचे नेतृत्व करणारे महान नेता



**लाला लजपत राय**
ब्रिटिशांविरूद्ध संघर्ष करताना बलिदान देणारे पंजाब केसरी



**विनायक दामोदर सावरकर**
क्रांतिकारी विचारांनी स्वातंत्र्य लढ्याला नवे बळ देणारे स्वातंत्र्यवीर



**सरदार वल्लभभाई पटेल**
भारताच्या एकतेसाठी संस्थानांचे विलिनीकरण करणारे लोहपुरुष


**केशवस्मृति**
नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल
१०२, १०३, आदित्य विहार को-ऑप. हौ. सोसायटी,
महात्मा फुले रोड, पनवेल. फोन : ८६५७००१८४१


प्रति,
.................................................................
.................................................................
.................................................................

printom269@gmail.com / Mob. 8805877900